43

सत्यमेव जयते


महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**नगर रचना संचालनालय**

**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०२६१२२६०३/२६१२२०७६** **Email ID: drtpvd.pune@maharashtra.gov.in**

**ddtp.ho@maharashtra.gov.in** do_tpv2@redoffmail.com


**विकास योजना काटोल (सु.+वा.क्षे), जि. नागपूर.**

मौजा काटोल, स.क्र.४४४/पै/१ व स.क्र.४४४/पै/३ या जमीनीवरील आरक्षण क्रमांक ९७ "Garden" (बगिचा) व आरक्षण क्र. ९८ "Play Ground" (खेळाचे मैदान) ही आरक्षणे व्यपगत होण्यासंदर्भाने अधिसुचना शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याची अधिसुचना निर्गमीत करणेबाबत.

श्रीम. पोरे, व.लि. 'A' प्रमाणे कार्यवाहीसाठी

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 411 दिनांक- 27.02.25
संबधित अधि./कर्म.
न.र. 27/02/25 20.2.25 उ.सं.न.र.

**जा. क्र.** डिटीपी/वि.यो. काटोल/कलम १२७(२)/आदेश/टिपीव्ही-२/ ९०९ दि. २४.०२.२०२५.

**शासन निर्णय**:- सोबतचे आदेश (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात (नागपुर विभागीय पुरवणीमध्ये) प्रसिध्द करावेत.

सहपत्रे:- वरीलप्रमाणे

(मसुदा मा.संचालक, न.र. यांनी मंजूर केला असे.)

**(सुदर्शन सि. गाडळकर)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.

/- त्यांना कळविण्यात येते की, सोबतचे आदेश (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात (नागपुर विभागीय पुरवणीमध्ये) प्रसिध्द करून त्यांच्या प्रत्येकी ५ छापील प्रती या कार्यालयास व प्रत्येकी २ छापील प्रती सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपुर आणि सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांना पाठवाव्यात.

**(कृ.मा.प.)**

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा. अपर मुख्य सचिव (०१), नगर विकास विभाग, (नवि-०९) मंत्रालय, मुंबई-३२.

२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर.

३) सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तवः-**

४) उपसंचालक, नगर रचना नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरचे आदेश अभिलेखार्थ त्यांचेकडील त्यासंबंधीच्या संकलन नस्तीमध्ये जोडावी. तसेच सदरचे आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखिल प्रसिध्द करावी.

५) जिल्हाधिकारी, नागपूर.

६) सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर.

/-सोबतच्या आदेशानुसार अधिप्रमाणित कारावयाचे भाग नकाशे पाच प्रतीत तयार करुन अधिप्रमाणित करण्यासाठी संचालनालयास उलटटपाली सादर करण्यात यावेत.

७) मुख्याधिकारी, नगर परिषद, काटोल, जि. नागपूर.

८) प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.

/- सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्यावत करावा.

९) अर्जदार श्री. लतिश दौलतराव रेवतकर व इतर, दोडकीपूरा, मेन रोड, ता. काटोल, जि.नागपूर.

महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे**

**४११००१**

# आदेश

जा.क्र.डि.टी.पी./वि.यो.काटोल(सु.+वा.क्षे.)/कलम-१२७(२)/आदेश/टिपीव्ही-२/९०९ दि.२४.०२.२०२५.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, काटोल नगर परिषदेची (सु.+वा. क्षे.) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे **"उक्त अधिनियम"** असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस- २४०६ /३१२३ / प्र.क्र.-१३३ (A) /०७ /नवि-९, दि.०४.११.२००८ अन्वये (यापुढे **"उक्त अधिसूचना"** असे संबोधिले आहे.) भागशः मंजूर केली असून ती दि.१५.१२.२००८ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजा **काटोल** येथील सर्व्हे नं. ४४४/ पै/१ व सर्व्हे नं. ४४४/ पै/३ या जमिनी अनुक्रमे आ.क्र. ९७, "बगिचा" व आ.क्र. ९८, "खेळाचे मैदान" **या** आरक्षणांनी बाधित होत आहे (यापुढे **"उक्त आरक्षणे"** असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणांच्या भुसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, काटोल आहे (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणांखालील जमीन संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील मौजा काटोल येथील सर्व्हे नं. ४४४/ पै/१ व सर्व्हे नं. ४४४/पै/३ या जमिनींमधील उक्त आरक्षणांनी बाधित क्षेत्राबाबत (यापुढे **"उक्त जमीन"** असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक यांनी (यापुढे **"उक्त जमीन मालक"** असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम-१२७(१) चे तरतुदीनुसार उक्त समुचित प्राधिकरणावर दि. **१२.०२.२०२१** रोजी सूचना (यापुढे **"उक्त सूचना"** असे संबोधिले आहे) बजाविलेली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालकाने उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने विहीत मुदतीत उक्त आरक्षणांखालील उक्त जमिनी संपादित केलेल्या नाही अथवा उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठाकडील रिट याचिका क्र. ६३२३/२०२२ मध्ये (यापुढे **"उक्त रिट याचिका"** असे संबोधिलेले आहे.) दि.१७.१०.२०२२ रोजीच्या आदेशात उक्त जमिनींवरील उक्त आरक्षणे उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबत आदेश पारीत केले आहेत;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी नगर परिषद, काटोल यांनी, पत्र क्र. नपका/ नरवि/क१२७/ ३४२/२०/२०२३, दि.१०.०१.२०२३ अन्वये, *सदर आरक्षण विकसीत करण्याकरीता आरक्षित जमीन भुसंपादीत करावयाची झाल्यास जागेची सन २०१३ च्या भुसंपादन कायद्यानुसार खुप जास्त प्रमाणामध्ये किंमत द्यावी लागणार आहे*, असे नमूद करुन सदर आरक्षण व्यपगतेबाबत प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे तरतुदीनुसार सूचना बजाविल्याच्या दिनांकापासून विहित २४ महिन्यांचा वैधानिक कालावधी पुर्ण होण्यापूर्वीच आरक्षणे व्यपगत ठरविले असल्याने प्रकरणी पुनर्विलोकन याचिका दाखल करणे उचित होईल, असे संचालनालयाने पत्र क्र. ९८६, दि. २८.०२.२०२३ रोजी शासनास कळविले होते;

आणि ज्याअर्थी, दरम्यानच्या काळात अर्जदार यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे तरतुदीन्वये बजावलेल्या दि.२२.०२.२०२१ रोजीच्या सूचनेस दि. २१.०२.२०२३ रोजी २४ महिन्यांचा विहित कालावधी पुर्ण झालेला आहे व तसेच मा. उच्च न्यायालयाचे आदेशाविरूद्ध पुनर्विलोकन याचिका दाखल झालेली नाही, हि वस्तुस्थिती विचारात घेऊन संचालनालयाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतूदीनुसार आदेश निर्गमित करणेसंबंधाने शासनस्तरावरुन मार्गदर्शन अपेक्षिले असता, शासनाने पत्र क्र. टिपीएस-२४२५/४१/प्र.क्र.०८/२०२५/नवि-९, दि. २९.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अर्जदार यांनी बजावलेल्या सूचनेच्या अनुषंगाने सदर जागेकरीता कलम-१२७(२) चे तरतुदीनुसार आदेश निर्गमित करणेस हरकत नाही, असे निदेश दिलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीचा मोजणी नकाशाची (मोजणी मामला क्र. २९५७, दि. ०८.०१.२०२१) व सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर यांनी प्रकरणी सादर केलेल्या भाग नकाशाची संचालनालयाच्या स्तरावरुन पडताळणी केली असता, आ.क्र. ९७, "बगिचा" व आ.क्र. ९८ "खेळाचे मैदान" या आरक्षणांनी उक्त जमिनींचे अनुक्रमे ८३८ चौ. मी. व ८२३ चौ. मी. क्षेत्र बाधित होत असल्याचे दिसून येते;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणांबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीनुसार सर्व्हे नं. ४४४/ पै/१ व सर्व्हे नं. ४४४/पै/३ या जमिनींच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणे व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम-१५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील सर्व्हे नं. ४४४/ पै/१ व सर्व्हे नं. ४४४/पै/३ या जमिनींच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

## परिशिष्ट

| अ. क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त जमिनींचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | काटोल नगर परिषद मौजा काटोल, ता.काटोल, जि. नागपूर. | आ.क्र.९७ -"बगिचा", अंदाजे क्षेत्र ०.८ हे. | सर्व्हे नं. ४४४/ पै/१ | ८३८ चौ. मी. |
| | | आ.क्र. ९८ "खेळाचे मैदान", अंदाजे क्षेत्र १.०६ हे. | सर्व्हे नं. ४४४/पै/३ | ८२३ चौ. मी. |

**टिप**:- १. उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनींच्या लगतच्या जमिनींवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणांतुन मुक्त झालेल्या उक्त जमिनींचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, काटोल, जि.नागपूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**(अविनाश भा. पाटील)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Maharashtra State
Directorate of Town Planning & Valuation
Central Building, Pune-411001

**ORDER**

No. D.T.P/D.P.Katol(R+AA)/Sec-127(2)/Order/TPV-II/ 909 Date:-24 .02.2025.

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Development Plan of Katol Municipal Council (Revised +AA) has been Partly sanctioned as per the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "**the said Act**") by the Government, in Urban Development Department vide Notification No.TPS-2406/3123/CR-133(A)/ 07/UD-9, dtd.04/11/ 2008 (hereinafter referred to as "**the said Notification**") & has come into force with effect from dt.15/12/2008, (hereinafter referred to as "**the said Sanctioned Development Plan**");

And whereas, in the said Sanctioned Development Plan, land bearing S.No. 444/P/1 and 444/P/3 of Mouza Katol are affected by the Site No. 97, "Garden" & Site No. 98, "Play Ground " (hereinafter referred to as "**the said Reservations**") and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservstions is Municipal Council, Katol (hereinafter referred to as "**the said Appropriate Authority**");

And whereas, the land affected by the said Reservations have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan come into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "**the said Land Owner**") of the land bearing S.No. S.No. 444/P/1 and 444/P/3 which is affected by the said Reservations (hereinafter referred to as "**the said Land**") had

served a notice as per the provisions of section 127(1) of the said Act, (hereinafter referred to as "**the said Notice**") on the said Appropriate Authority on 12.02.2021;

And whereas, the said land under the said Reservations are not acquired or no steps as required as per the provisions of section 127 (1) of the said Act has been taken by the Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench in the order dt. 17.10.2022 in Writ Petition No. 6223/2022 (hereinafter referred to as "**the said Writ Petition**") has passed an order that, the said Reservations on the said lands have lapsed as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, Chief Officer, Municipal Council, Katol vide Marathi letter No. नपका/नरवि/क१२७/३४०/२०/२०२३, dt. 10.01.2023 has submitted a proposal to the Government regarding the lapsing of the said reservation, stating that, *if the land reserved for the said reservations is to be acquired, the price of the land will have to be paid at a much higher rate as per the Land Acquisition Act of 2013*;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune vide letter No. 986, dt. 28.02.2023 informed to the Government that, the said Reservations have been lapsed before the completion of the statutory period of 24 months from the date of issuing the notice as per the provisions of section 127 of the said Act, Therefore, it would be appropriate to file a review petition in the matter;

And whereas, in the meantime, the statutory period of 24 months has been completed on 21.02.2023 regarding the notice dt. 22.02.2021 issued under the provisions of section 127 of the said Act by the said Land Owner and also Considering the fact that, no Review Petition filed against the order of the High Court, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune had seek guidance

from the Government regarding the issuance of an order as per the provisions of section 127 (2) of the said Act, the Government, vide marathi letter No. टिपीएस-२४२५/४१/प्र.क्र.०८/२०२५/नवि-९, दि. २९.०१.२०२५, directed that, there is no objection to the issuance of an order under the provisions of section 127 (2) in accordance with the notice issued by the the said Land Owner, for the said land;

And whereas, on verification of the Measurement Plan (मोजणी मामला क्र.2957, dated 08.01.2021) of the said lands and the Part Plan Submitted by the Assistant Director, Town Planning Nagpur Branch, Nagpur at Directorate level, It is observed that, area affected by the Reservation No. 97 "Garden" and Reservation No. 98 "Play Ground" of the said lands is 838 sq. mt & 823 sq. mt. respectively;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservations on the said lands in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservations on the land bearing S. No. S.No. 444/P/1 and 444/P/3;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR-508/UD-13, dt.01/12/2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (2) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservations in respect of the land bearing S.No. S.No. 444/P/1 and

444/P/3 as per the provisions of section 127(2) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added:-

## SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council Mouza, Taluka and District | Proposal in the said sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report | Description of the said Land | Approximate Area lapsed from the said Reservations (sq.mt.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Katol Municipal Council, Mouza Katol, Tal. Katol, Dist. Nagpur. | Site No. 97 "Town Hall", Area 0.8 ha. | S.No. 444/P/1 | 838 |
| | | Site No. 98 "Garden", Area 1.06 ha. | S.No. 444/P/3 | 823 |

**Note:-** 1.The said Lands so released from the said Reservations shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

2. A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the areas of the said Lands which are lapsed from the said Reservations are available in the office of the Chief Officer, Municipal Council, Katol, District Nagpur during office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This Order shall also be published on the Directorate's official website. www.dtp.maharashtra.gov.in.

TOWN AND VALUATION DEPARTMENT ... OF TOWN PLANNING ... M.S. PUNE

(Avinash B. Patil)
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.